नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 01/03/2021 (सोमवार)

(सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 02 कि. मी अंतरावर बुधवारपेठ उमरेड येथे दिनांक 28/02/2021 चे 09.00 वा. ते 18.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मंगेश नरहरी साखरकर, वय 32 वर्ष, रा. आंबोली नाका बुधवारपेठ उमरेड हे आपल्या पत्नीसह घराला कुलुप लावुन शेतामध्ये गेले होते. ते सायंकाळी शेतामधून घरी परत आले तर घराचे समोरील दाराचे लॉक तुटलेले दिसले. फिर्यादीने पत्नीसह घरामध्ये पाहीले असता बेडरूममध्ये ड्रेसींग टेबलचे काचावर ठेवलेली सोन्याची काळे मण्याची जुनी गळसोळी कि. 18,000/–रू., तसेच कपाट खोलून पाहीले असता कपाटाचे ड्रॉपमध्ये ठेवलेले सोन्याचे कि. 20,000/–रू. असा एकुण कि. 38,000/– रु चा माल मिळुन आला नाही अज्ञात आरोपीने फिर्यादी यांचे घरातील सोन्याचे दागिने कि. 38,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मारोती राउत 9975213230 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावर चिखोली रोहना फाटा येथे दिनांक 13/02/2021 चे 10:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुर्यभान गोविंदा धोटे, वय 36 वर्ष, रा. हिवरा त. चिमूर जि. चंद्रपूर हा मृतक/आरोपी नामे– विनोद गोविंदा धोटे, रा. हिवरा ता. चिमुर जि. चंद्रपुर याचा मोठा भाउ आहे. आरोपी हा त्याच्या काकाची एमएच–34/ एडब्ल्यू–1308 क्रमांकाची मोटरसायकल घेवून भिवापूर ला नातेवाईकांना आणण्यासाठी आला व पाहूने भिवापूरला न आल्याने भिवापूर वरून त्याच मार्गाने चिखली रोहना मार्ग परत येत होता. त्यादरम्यान रोहना फाटयाजवळ त्याचे मोटरसायकल वरील नियंत्रण सूटले व रोडच्या लगत असलेल्या झाडाला आदळून त्याचा अपघात झाला. या अपघातात फिर्यादीचा भाउ आरोपी हा गंभीर जखमी झाला. त्याला उपचाराकरीता प्रथम ग्रामीण रूग्णालय भिवापूर व नंतर नागपूर येथे नेले असता उपचारा दरम्यान दिं. 18/02/21 चे 02.00 वा. दरम्यान मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा राजेंद्र डहाके पो स्टे भिवापूर हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत नांदा ओव्हरब्रिज खापरखेडा येथे दिनांक 27/02/2021 चे 22:20 वा. ते 22.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– नितीन अशोक मनोहरराव सदावर्ते, वय 42 वर्ष, रा बिनाकी, वैशालीनगर वार्ड न 25 मंगळवारी मेंहदीबाग रोड यांचा भाउ नामे– महेंद्र सदावर्ते, जिजा नामे– अनील बिसीकर व चालक रमेश रंभाड सोबत ईनोवा गाडी क्र एमएच–49 बी–9889 ने खापा वरून नागपूर कडे येत असतांना यातील आरोपी ट्रक टिप्पर क्र एमएच–31/एफसी–6399 चे चालकाने आपले ट्रक नांदा उडाण पूलावर कोणतेही प्रकारचे इंडीकेटर व

टेललाईट सुरू न ठेवता उभा केला. सदर इनोव्हा गाडीचे चालकाने आपले वाहन अचानक समोर उभा असलेल्या ट्रक ला मागून धडक दिल्याने अपघातात ईनोवा गाडी चालक नामे— रमेश रंभाड हे मरण पावले व ईतर दोन लोक जख्मी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि मिश्रा पो.स्टे खापरखेडा मो.न 9923694709 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर